सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १४८ | बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

### आजचे अभीष्टचिंतन





**श्री. रमेश छाजेड**
व्यापारी



**श्री. राकेश निळे**
प्रताप महाविद्यालय



**श्री. संदीप पाटील**
मंगळग्रह मंदिर सेवेकरी



**श्री. पंकज सैनानी**
अमळनेर

'माझा संकल्प- भूमी सुपोषण' चळवळीसाठी

# अमळनेरमध्ये आज भव्य महाशोभायात्रा

## अक्षय कृषी परिवार, मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे उपस्थितीचे आवाहन

माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः
भूमि सुपो॰॰ एव सरक्षण अभियान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : कृषी क्षेत्रातील अग्रगण्य सेवाभावी संस्था अक्षय कृषी परिवार व येथील मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे माझा संकल्प- भूमी सुपोषण चळवळीसाठी जनजागर व्हावा, यासाठी बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी भव्य महाशोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ऐतिहासिक व अभूतपूर्व होणाऱ्या या महाशोभायात्रेचे अमळनेरकरांनी साक्षीदार व्हावे, असे आवाहन अक्षय कृषी परिवार व श्री मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

महाशोभायात्रा सुरू होण्यापूर्वी सर्वांना पोटभर नाश्ता दिला जाणार आहे. महाशोभायात्रा मार्गावरही ठिकठिकाणी गोळ्या- बिस्किटे, हलका- फुलका नाश्ता व जलपानाची व्यवस्था केली जाणार आहे. सर्व शाळा- महाविद्यालये, विद्यार्थी- विद्यार्थिनी, विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व महिला संघटनांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अक्षय कृषी परिवार व श्री मंगळग्रह सेवा संस्थेने केले आहे.

### महाशोभायात्रा प्रारंभ, स्थळ व मार्ग

बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थान येथून महाशोभायात्रेस प्रारंभ होईल. संतश्री सखाराम महाराजांची वाडी- सराफ बाजार- कोंबडी बाजार- हॉटेल पायल- राणी लक्ष्मीबाई चौक- मोठा बाजार- दगडी दरवाजा- फरशी रोडमार्गे श्री मंगळग्रह मंदिरात महाशोभायात्रेची सांगता होईल. (मंदिरात महाशोभायात्रेतील सहभागींसाठी भोजन व्यवस्था आहे.)

# अजितदादा पवार यांचा अमळनेरला पुतळा उभारा

## राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अनिलदादा पाटील यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील नव्याने बांधण्यात येत असलेल्या प्रशासकीय इमारतीच्या परिसरात माजी उपमुख्यमंत्री (स्व.) अजितदादा पवार यांचा पुतळा उभारण्यात यावा. त्यासाठी शासनस्तरावर यथायोग्य पाठपुरावा करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष मुख्तार खाटीक, कार्याध्यक्ष विनोद कदम यांच्यासह कार्यकर्त्यांनी केली आहे. याबाबत त्यांनी आमदार अनिलदादा पाटील यांना सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी निवेदन दिले आहे.



*अमळनेर : आमदार अनिलदादा पाटील यांना निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे इम्रान खाटीक, गोविंदा बाविस्कर व कार्यकर्ते.*

निवेदनात म्हटले आहे, की अमळनेर तालुक्याच्या विकासासाठी विविध विकासकामांना (स्व.) अजितदादा पवार यांनी मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे. महसूल इमारत, प्रशासकीय इमारत, उपजिल्हा रुग्णालय, पंचायत समिती इमारत, एस. टी. कार्यशाळा आणि सर्वात मोठा निम्न तापी प्रकल्प पाडळसरे धरणासाठी (स्व.) अजितदादा पवारांचे योगदान आहे. त्यामुळे तालुक्याने त्यांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी नवीन प्रशासकीय इमारती बाहेर त्यांचे स्मारक अथवा पुतळा उभारण्यात यावा. यासाठी खासदार स्मिताताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील, प्रांताधिकारी, तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंते यांनी सामूहिकरित्या प्रयत्न करून पाठपुरावा करावा. योग्य कागदपत्रे, प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठवावा.

निवेदनावर शहराध्यक्ष मुख्तार खाटीक, कार्याध्यक्ष विनोद कदम, इम्रान खाटीक, आलिम मुजावर, सचिन पाटील, राहुल गोत्राळ, कैलास पाटील, गोविंदा बाविस्कर, नीलेश देशमुख, अर्षद खाटीक, भूषण पाटील, अनिल शिसोदे, सुलतान खाटीक, मधुकर पाटील, महेंद्र पाटील, अलीम मुजावर, किशोर देसले, जाकीर खाटीक, निखिल पाटील, पंकज जैन, जे. व्ही. बाविस्कर, एन. जे. पाटील, एस. जी. बत्तीसे, एस. आर. शिंगाणे, चेतन बोरसे, भय्या वाघ, बाबा खाटीक, गौरव पाटील आदींच्या सह्या आहेत.

# अमळनेरच्या लायन्स क्लबची उत्कृष्ट क्लब म्हणून विभागात निवड

## तब्बल १३ ट्रॉफी, मेडल, प्रमाणपत्रांनी धुळे येथे सन्मान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : धुळे येथील हॉटेल ओर्चीड येथे शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या लायन्स रीजन कॉन्फरन्समध्ये येथील लायन्स क्लबला उत्कृष्ट सेवा कार्य व उल्लेखनीय कामगिरीबद्दल तब्बल १३ ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले. क्लबच्या विविध सामाजिक उपक्रमांची दखल घेत 'उत्कृष्ट क्लब' म्हणून निवड करण्यात आल्याने सदस्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



*धुळे : लायन्स रिजन कॉन्फरन्समध्ये अमळनेर लायन्स क्लबचे योगेश मुंदडे यांना ट्रॉफी देवून सन्मानित करताना मान्यवर.*

यावर्षीचा 'ड्रीम प्रोजेक्ट' म्हणून अवयवदान जनजागृती मोहिमेवर विशेष भर देण्यात आला आहे. अवयव दान पोस्टर प्रकाशन, गणेशोत्सव काळातील जनजागृती अभियान आदी उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचविण्यात मोठी मदत झाली आहे. या उपक्रमाचा परिपाक म्हणून लायन्स सदस्य महावीर पहाडे यांनी त्यांच्या मातोश्री कांताबेन पहाडे यांचे देहदान जाहीर केले. त्यांच्या या कार्याची सर्व प्रसार माध्यमातून बातमी व जनजागृती झाल्याने आतापर्यंत ८ जणांनी देहदानासाठी अर्ज भरल्याची माहिती देण्यात आली.

मुलींमध्ये गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविरुद्ध संरक्षणासाठी एचपीव्ही लसीकरण शिबिर, वासरे गावातील पूरग्रस्तांना अन्नदान, बसपास अभावी शिक्षण सोडण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या साने गुरुजी शाळेतील एका विद्यार्थ्याला वर्षभरासाठी दत्तक घेण्यासारखे उपक्रम राबविण्यात आले. या विविध प्रकल्पांमुळे क्लबला एकूण १३ पुरस्कार प्राप्त झाले. या प्रसंगी ज्येष्ठ लायन्स सदस्य बजरंग अग्रवाल, योगेश मुंदडा, डॉ. युसूफ पटेल, विनोद अग्रवाल, डॉ. रवींद्र कुलकर्णी यांना विशेष ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. कॉन्फरन्सला रीजन चेअरमन चेतनभाई बर्दिया, डीजी अश्विनजी बजोरिया, पीडीजी गिरीशभाई शिसोदिया तसेच प्रमुख पाहुणे गिरीशभाई मालपानी उपस्थित होते.

यावेळी क्लबचे अध्यक्ष डॉ. संदीप जोशी, सचिव महेंद्र पाटील, खजिनदार नितीन विंचुरकर यांच्यासह बजरंगलाल अग्रवाल, एस.डी. भरुचा, प्रदीप जैन, सुनील चौधरी, शेखर धनगर, जितेंद्र जैन, अभिषेक जैन, हरिओम सोनी, दिनेश मणियार, कमलेश भंडारी, प्रकाश जैन आदी उपस्थित होते. यश कोणत्याही एकाच व्यक्तीचे नसून ते सर्व सदस्यांच्या एकजुटीचे, टीमवर्कचे व समर्पणाचे फलित आहे. वर्षभर राबविलेल्या प्रत्येक प्रकल्पाचा हा सन्मान आहे, अशी भावना अध्यक्ष डॉ. संदीप जोशी यांनी व्यक्त केली.

**तहसीलच्या आवारात दिवसाही पथदिवे सुरू**

पान २ वर...

# भव्य महाशोभायात्रा

श्री मंगळग्रह मंदिर अमळनेर | भूमि सुपोषण एवं संरक्षण अभियान | मंगल ग्रह सेवा संस्था, अमळनेर

जहाल विषारी रासायनिक खते व कीटकनाशकांच्या बेसुमार वापरामुळे आपल्या परम पवित्र भारतमातेची शेती व माती विषारी व निकस झाली आहे...!

## मेरा संकल्प - भूमी सुपोषण चळवळ

देशभर प्रभावीरित्या राबवूया...!!! त्यासाठीच्या

**जनजागर महाशोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होऊया...!!!!**

चला आपली भूमी, शेती व माती सकस, विषमुक्त व उपजावू करूया...!



**महाशोभायात्रेची तारीख व वेळ**
बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६
वेळ : सकाळी ८ वाजता.
**महाशोभायात्रा प्रारंभ स्थळ**
संतश्री सखाराम महाराजांची वाडी

आपले स्वागताभिलाषी,
**अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर**

## संपादकीय

# खेळाडू व्हायचे की खेळणे?

मानवी जीवन हे एका विस्तीर्ण रंगमंचासारखे आहे. प्रत्येकाच्या वाट्याला आलेली भूमिका वेगळी असली, तरी त्या भूमिकेत आपण कसे वागतो, हेच आपल्या आयुष्याचे खरे मूल्य ठरवते. आयुष्य हे खेळासारखे असते. खेळणे बनायचे की खेळाडू, हा निर्णय मात्र प्रत्येकालाच स्वत: घ्यावा लागतो. आजच्या धावपळीच्या काळात माणूस सतत तणावाच्या भोवऱ्यात अडकलेला दिसतो. जगात दोनच प्रकारची माणसे असतात. एक ती, जी स्वत: तणावात जगतात आणि दुसरी ती, जी इतरांच्या आयुष्यात तणाव निर्माण करतात. आपण नेमके कोणत्या गटात आहोत, याचा आत्मपरीक्षणाने विचार करण्याची हीच योग्य वेळ आहे. कारण बुद्धीला पटल्याशिवाय केलेला कोणताही विचार शेवटी आपल्यालाच त्रास देतो. पाण्यावर तरंगणारा मृतदेह एक खोल सत्य सांगून जातोवजन शरीराचे नसून श्वासाचे असते. श्वास असेपर्यंत माणसाची किंमत असते; श्वास गेला की देह नकोसा होतो. त्यामुळे 'आज' जगा, आनंद घ्या. कारण एन्जॉय करण्याची संधी गमावली तर उद्या एन्जिओग्राफीसारख्या तपासण्यांची वेळ येऊ शकते, हे कटू असले तरी वास्तव आहे. प्रवासात आपले स्थान आले की रिकामी झालेली खिडकीजवळची जागा निरुपयोगी ठरते. तसेच आयुष्यातही काही माणसे, वस्तू आणि आनंद हे योग्य वयात, योग्य वेळीच भेटले तरच त्यांची किंमत असते; अन्यथा ते निरर्थक ठरतात. आयुष्य मिळणे हा नशिबाचा भाग असतो, मृत्यू येणे हा काळाचा भाग असतो, पण मृत्यूनंतरही लोकांच्या मनात जिवंत राहणे हे केवळ आपल्या चांगल्या कर्मांवर अवलंबून असते. मतलबी माणसांचे स्वरूपही समुद्रासारखेच असते. कितीही साखर टाकली तरी समुद्र गोड होत नाही, तसेच कितीही आपुलकी दाखवली तरी स्वार्थी माणसे आपली होत नाहीत. अशा ठिकाणी स्वतःचा स्वाभिमान जपणे अधिक महत्त्वाचे ठरते. जेथे आपल्या शब्दाला किंमत नसते, तेथे शांत राहणे आणि ज्या ठिकाणी आपल्या उपस्थितीने त्रास होतो, तेथे न जाणे हाच खरा स्वाभिमान आहे.

स्त्री आणि दिव्यातील वात यांची तुलना समाजमनात खोलवर रुजलेली आहे. वात स्वतः जळून इतरांना प्रकाश देते, तसेच स्त्रीही अनेकदा स्वतःचा विचार न करता कुटुंबासाठी आयुष्य झिजवते. पण सातत्याने सहन करण्याची सवय लागली की दुःखही व्यक्त करावेसे वाटत नाही, आणि हीच सवय माणसाला आतून एकाकी करते. एखाद्याला आपली किंमत कळाली नाही म्हणून नाराज होण्यात अर्थ नाही. कारण भंगाराच्या व्यापाऱ्याला हिऱ्याची पारख कधीच नसते. आजचे जगही विचित्र झाले आहे. खोटे वागले तर 'मोठे' म्हणतात आणि चांगले वागले तर 'वाईट' ठरवतात. म्हणूनच अती मोह आणि अती काळजी या दोन्ही गोष्टी दुःखाचे मूळ ठरतात. जीवनात सर्व काही प्रमाणात असणे आवश्यक आहे. चित्त सद्विचारांनी भरलेले असावे, समतोल राखावा आणि स्वतःची ओळख जपावीयातच जीवनाचे खरे सौंदर्य दडलेले आहे. शेवटी प्रश्न एकच उरतो आपण आयुष्याचे खेळाडू आहोत की कुणाच्या तरी हातातील खेळणे? याचे उत्तर प्रत्येकाने स्वतःलाच शोधायचे आहे.

# ग्रामपंचायतीतच मिळणार आता ५८७ सरकारी सेवा

## ग्रामीण भागातून शहरात जाण्याचा त्रास होणार कमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : ग्रामीण भागातील नागरिकांसाठी राज्य सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. आता आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून पासपोर्ट काढण्यापर्यंतच्या ५८७ सरकारी सेवा ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण जनतेला आता शासकीय कामांसाठी तालुक्याच्या गावी जाण्याची गरज उरणार नाही.




आतापर्यंत या कामांसाठी ग्रामीण भागातील नागरिकांना शहराची वाट धरावी लागत होती. मात्र, आता या सर्व सुविधा ग्रामपंचायतींत मिळणार आहेत. त्यामुळे प्रामुख्याने वेळ आणि पैशांची बचत होईल. दाखल्यांसाठी किंवा अर्जासाठी वारंवार तालुका किंवा जिल्हा मुख्यालयात जावे लागत असे. आता ही सुविधा गावातच उपलब्ध झाल्याने प्रवासाचा खर्च आणि वेळ वाचणार आहे. सोबतच मध्यस्थांची गरज संपल आहे. थेट ग्रामपंचायतीतून अधिकृत ऑनलाइन अर्ज करता येत असल्याने एजंट किंवा मध्यस्थांकडून होणारी फसवणूक थांबेल. एकाच छताखाली सर्व सेवा अर्थात ५८७ प्रकारच्या सेवा मिळणार असल्याने कागदपत्रांची जुळवाजुळव करणे सोपे होणार आहे. पासपोर्ट आणि तिकीट बुकिंगची सोय असणार आहे. ग्रामीण तरुणांना आता पासपोर्ट अर्जासाठी शहरात धाव घेण्याची गरज नाही. तसेच रेल्वे आणि विमानाचे तिकीट बुकिंगही आता गावातूनच करणे शक्य झाल्याने वेळेची बचत होईल.

**६१९ ग्रामपंचायतींत लवकरच सेवा**

जळगाव जिल्ह्यातील ५२९ ग्रामपंचायतींमध्ये ही सेवा प्रत्यक्ष सुरू झाली आहे. धरणगाव तालुक्याने ९७टक्के काम पूर्ण करून आघाडी घेतली आहे. उर्वरित ६१९ ग्रामपंचायतींत लवकरच यूजर आयडी सक्रिय करून सेवा सुरू करण्यात येणार आहे. आता ग्रामपंचायत कार्यालय हे केवळ प्रशासकीय केंद्र न राहता खऱ्या अर्थाने डिजिटल सेवा केंद्र बनले आहे. ज्याचा थेट फायदा शेतकरी, विद्यार्थ्यांना होईल.

या सुविधा मिळणार जातीचा दाखला, उत्पन्न व रहिवासी दाखला, जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी, पासपोर्ट अर्ज नोंदणी, रेल्वे व विमान तिकीट बुकिंग, विविध सरकारी योजनांचे अर्ज, वय व अधिवास प्रमाणपत्र, परवाने व परमिट, सातबारा व आठ-अ उतारा, ऑनलाइन लोकसेवा हक्क.

## विजेची उधळपट्टी..!

# तहसीलच्या आवारात दिवसाही पथदिवे सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील तहसील कार्यालय आवारात दिवसाही पथदिवे सुरू आहेत. परिणामी विजेची उधळपट्टी होत असल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाच्या हलगर्जीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. संबंधितांनी याची दखल घेण्याची गरज आहे.




*अमळनेर : तहसील आवारात सुरू असलेला पथदिवा.*

तहसील आवारातील संजय गांधी योजना शाखा कार्यालयाबाहेर दुपारच्या सुमारास पथदिवे सुरू असल्याचे दिसून आले. काही कार्यालयातील कर्मचारी जरी कुठे बाहेर गेले असले तरी पंखे व पथदिवे सुरूच असतात. शासन स्तरावर ऊर्जा बचतीचे आवाहन केले जाते. मात्र, असे असताना शासकीय कार्यालय परिसरातच अशा प्रकारे निष्काळजीपणा होत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. तहसील प्रशासनाने या प्रकाराकडे तातडीने लक्ष देऊन वीज बचतीबाबत काटेकोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



*अमळनेर : महाशिवरात्रीनिमित्त महाप्रसाद वाटप करताना पवन शिंपी, जीवन पवार व कार्यकर्ते.*

# राजे शिवाजी मित्रमंडळातर्फे महाशिवरात्रीनिमित्त महाप्रसाद वाटप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील छत्रपती शिवाजी नगरातील राजे शिवाजी मित्र मंडळातर्फे रविवार, दि. ८ फेब्रुवारीला महाशिवरात्री निमित्त विविध धामिक कार्यक्रम झाले. याप्रसंगी महाप्रसाद वाटपही करण्यात आले. भाविकांची मोठी उपस्थिती होती.

यावेळी भगवान शंकरांची विधीवत पूजा, अभिषेक तसेच भक्तिमय वातावरणात महाशिवरात्री उत्सव साजरा करण्यात आला. परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रम भक्तीमय व मंगलमय वातावरणात पार पडला. मंडळाचे कार्यवाहक किशोर पाटील, मधुभाऊ चौधरी, सागर शिंपी, अजय पाटील, पवन चौधरी, पवन शिंपी, विकी पाटील, रुपेश धोबी, दीपक चौधरी, गिरीश पाटील, बबलू पाटील, करण नेरकर, सुरज शिंपी, जीवन पवार, अजय ठाकूर आदींनी सहकार्य केले. माजी नगरसेवक प्रताप शिंपी यांनी मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक केले.

# 'महिला अन्यायविरोधी समिती'त सहभागी व्हा : धनंजय सोनार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : संसारातील छोटे- मोठे वाद, पती-पत्नीमधील विसंवाद आणि कोर्ट-कचेऱ्यांच्या फेऱ्यात अडकलेली कुटुंबे वाचविण्यासाठी 'महिला अन्याय विरोधी समिती'ने राज्यभर आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे. नव्या सदस्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन समितीचे अध्यक्ष धनंजय सोनार यांनी केले आहे.

आजवर शंभराहून अधिक विखुरलेले संसार पुन्हा उभे करणाऱ्या या समितीने आता आपल्या कार्याचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. अमळनेरसह जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्हा व राज्यातील सेवाभावी नागरिकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सध्याच्या धावपळीच्या युगात शुल्लक कारणावरून घटस्फोटापर्यंत पोहोचणारी प्रकरणे कौटुंबिक समुपदेशनाद्वारे सोडवली जाऊ शकतात. त्यामुळे दोन्ही परिवारांची होणारी आर्थिक आणि मानसिक ओढाताण थांबते. या सामाजिक कार्यात रस असणाऱ्या महिला, पुरुष आणि तरुण वर्गासाठी समितीची दारे उघडी आहेत. या कार्यात सहभागी झाल्याने शास्त्रीय पद्धतीने समुपदेशन करण्याचे कौशल्य आत्मसात होईल. सामाजिक जाणिवा विस्तारून मित्रपरिवारात वाढ होईल. विखुरलेली कुटुंबे पुन्हा जोडल्याचे आत्मिक समाधान मिळते. इच्छुक व्यक्ती आपल्या भागात समितीची शाखा देखील सुरू करू शकतात. तरी सामाजिक कार्याची आवड असलेल्या कोणत्याही वयोगटातील सज्ञान महिला- पुरूषांनी अधिक माहितीसाठी समितीचे अध्यक्ष धनंजय सोनार (अमळनेर) यांच्याशी (७९७२८८१४४०) या व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# हर्षवर्धन सपकाळांच्या वक्तव्याचा भाजपतर्फे निषेध!

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ घोषणाबाजी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांना समकक्ष मानावे, असे वक्तव्य केले आहे. याचे सर्वत्र तीव्र पडसाद उमटले आहेत. या वक्तव्याच्या निषेधार्थ सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी येथील भाजपतर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांनी सपकाळ यांच्या वक्तव्याचा निषेध करत घोषणाबाजी केली. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत असून




*अमळनेर : छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ निषेध व्यक्त करताना भाजपचे पदाधिकारी योगेश महाजन, अ‍ॅड. व्ही. आर. पाटील, डॉ. अनिल शिंदे, संदीप पाटील, श्याम पाटील, सौ. भारती सोनवणे व कार्यकर्ते.*

त्यांची तुलना इतर कोणत्याही ऐतिहासिक व्यक्तीशी करणे अयोग्य असल्याची भूमिका उपस्थितांनी मांडली. या आंदोलनात भाजपचे योगेश महाजन, डॉ. अनिल शिंदे, अ‍ॅड. व्ही. आर. पाटील, संदीप पाटील, श्याम पाटील, लालचंद सेनानी, सौ. भारती सोनवणे, हिरालाल पाटील, विजय राजपूत, तुळशीराम हटकर, देवा लांडगे, हरचंद लांडगे, विजय पाटील, दीपक पाटील, महेश पाटील, दीपक पवार, भरत परदेशी, हर्षल महाजन, अनिरुद्ध शिसोदे, कुणाल चौधरी, कल्पेश पाटील, शुभम पवार, उज्वल मोरे यांच्यासह भाजपचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. या प्रकरणी सपकाळ यांनी तत्काळ माफी मागावी, अशी मागणीही भाजप पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

# भारत- अमेरिका शेतीमाल करार रद्द करा

## अमळनेर येथे किसान काँग्रेसचे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारत सरकार आणि अमेरिका यांच्यात झालेल्या शेतीमाल आयात-निर्यात कराराविरूद्ध देशभरात शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर हा रद्द करावा, अशी मागणी येथील राष्ट्रीय किसान काँग्रेसने केली आहे. याबाबत त्यांनी प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की सदर करारानुसार अमेरिकेतून भारतात येणाऱ्या शेतीमालावर शून्य टक्के आयात शुल्क लागू करण्यात आली आहे, तर भारतीय शेतीमाल अमेरिकेत निर्यात करताना १८ टक्के कर आकारला जात जाणार आहे. हा करार एकतर्फी आणि अन्यायकारक आहे. अमेरिकेतील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर शासकीय अनुदान दिले जाते. त्यामुळे त्यांचा मका, सोयाबीन, कापूस, दूध व इतर कृषी उत्पादने भारतीय बाजारपेठेत अत्यंत कमी दरात उपलब्ध होऊ शकतात. परिणामी, देशातील मका, सोयाबीन आणि कापूस उत्पादकांना मोठा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच दुग्ध व्यवसायावरही गंभीर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात



*अमळनेर : प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन देताना किसान काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. सुभाष पाटील व शेतकरी.*

आहे. या करारामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था डळमळीत होईल. अनेक शेतकरी कर्जबाजारीपणात अडकतील. त्यामुळे अमेरिका-भारत शेतीमाल करार तात्काळ रद्द करावा. भारतीय शेतीमालावरील अन्यायकारक कर हटवावेत. आयात नियंत्रणासाठी कठोर धोरण लागू करावे. सर्व शेतीमालाला कायदेशीर हमीभाव देण्याचा कायदा करावा.

दरम्यान, सरकारकडून याबाबत अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. मात्र, मागण्यांची तात्काळ दखल न घेतल्यास देशव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकरी संघटनांनी दिला आहे. याप्रसंगी किसान काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. सुभाष पाटील व अनेक शेतकरी उपस्थित होते.

# धुळे रस्त्यावरील प्रवेशद्वाराला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव द्या

## सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : धुळे रस्त्यावरील प्रवेशद्वाराला महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीने केली आहे. याबाबत त्यांनी नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर व मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना निवेदन दिले आहे.



*अमळनेर : मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना निवेदन देताना सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे भूषण पाटील, अक्षय शिर्के, राहुल कंजर, तुषार सोनार आदी.*

निवेदनात म्हटले आहे, की १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचा पवित्र दिवस आहे. याचे औचित्य साधून धुळे रस्त्यावरील प्रवेशद्वाराला "राजे छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार" असे नामकरण करण्यात यावे, ही सर्व शिवप्रेमींची मनापासूनची भावना आहे. शहरात प्रवेश करतानाच शिवरायांचे नाव अभिमानाने झळकावे, यासाठी हा निर्णय घेणे आवश्यक आहे. पालिका प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देऊन शिवजयंतीपूर्वी निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा समितीने व्यक्त केली आहे. यावेळी सार्वजनिक शिवजयंती समितीचे भूषण पाटील, अक्षय शिर्के, राहुल कंजर, तुषार सोनार, भूषण महाजन, अमर सोनार, गणेश अहिरे, देव गोसावी, दादा सोनार, पंकज न्हावी, भावेश साळुंखे, मनोज शिंगाणे, लोकेश महाजन, आशिष अंधारे, कृष्णा पाटील, विपूल पाटील, योगेंद्र बाविस्कर, भागवत पाटील आदी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# मुंबई में कुछ नाम ऐसे हैं जो हर रोज़ हमारी ज़िंदगी में शामिल हैं

## लेकिन हम यह नहीं जानते कि उनके पीछे कितनी बड़ी कहानी छिपी है।

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सड़कों पर चलते हुए, स्टेशनों से गुज़रते हुए, चौकों पर रुकते हुए हम जिन नामों को पढ़ते हैं, उनमें नाना शंकरशेठ भी शामिल हैं। उनकी मूर्ति है, स्कूल है, सड़क है, चौक है। अब एक स्मारक भी है। लेकिन सवाल यह है कि क्या यह सब उनके कद के बराबर है। और उससे भी बड़ा सवाल यह कि क्या मुंबई ने सच में उन्हें वह जगह दी, जिसके वे हकदार थे।

नाना शंकरशेठ, जिन्हें लोग प्यार से नाना कहते थे, दक्षिण मुंबई में रहते थे, वहीं काम करते थे, और वहीं उन्होंने अपने जीवन की सबसे बड़ी पूंजी इस शहर को सौंप दी। गिरगांव से लेकर मरीन लाइंस और बॉम्बे सेंट्रल तक का इलाका उनकी कर्मभूमि था। इसके बावजूद उनका स्मारक एंटॉप हिल जैसे इलाके में बनाया जाना कई सवाल खड़े करता है। क्या यह सिर्फ़ एक प्रशासनिक फैसला था या फिर इतिहास को हाशिये पर धकेलने की एक और मिसाल।


### स्मारक और स्मृति के बीच का फर्क

अक्सर स्मारक राजनीतिक शक्ति प्रदर्शन बनकर रह जाते हैं। पत्थर और कांसे की संरचनाएँ खड़ी कर दी जाती हैं, लेकिन उनके पीछे की आत्मा कहीं खो जाती है। नाना शंकरशेठ के लिए यदि दक्षिण मुंबई में एक स्मारक बनता, तो वह किसी राजनीतिक एजेंडे का हिस्सा नहीं होता, बल्कि एक कृतज्ञ शहर की ओर से सच्ची श्रद्धांजलि होता। लेकिन शायद शहर के निर्णयकर्ताओं को लगा कि यह स्थान किसी और के लिए ज़्यादा ज़रूरी है।

यह विडंबना ही है कि जिन लोगों ने मुंबई की नींव रखी, वही आज सबसे कम याद किए जाते हैं। नाना शंकरशेठ शिक्षा सुधारक थे, समाज सुधारक थे, दानवीर थे, और ब्रिटिश भारत में भारतीयों की आवाज़ भी। इसके बावजूद उनका नाम आज की सार्वजनिक चर्चा में शायद ही आता है।

### पारसी योगदान और एक भूली हुई समानांतर कहानी

उन्नीसवीं सदी की मुंबई को आकार देने में पारसी समुदाय का योगदान सर्वमान्य है। जमशेदजी जीजीभॉय, कावसजी जहांगीर, दादाभाई नौरोजी और फिरोज़शाह मेहता जैसे नाम आज भी सम्मान के साथ लिए जाते हैं। डेविड ससून जैसे यहूदी उद्योगपति भी इस सूची में शामिल हैं। लेकिन इसी दौर में नाना शंकरशेठ भी इन्हीं क़दमों से क़दम मिलाकर चल रहे थे। जीजीभॉय के साथ मिलकर उन्होंने शहर के पहले बड़े शहरी परिवर्तन की नींव रखी। फर्क सिर्फ़ इतना रहा कि पारसी योगदान को समय के साथ याद रखा गया, जबकि नाना शंकरशेठ का नाम धीरे-धीरे समकालीन स्मृति से फिसलता चला गया।



### एक बरसी, जो बिना शोर के गुज़र गई

३१ जुलाई २०२५ को नाना शंकरशेठ की १५० वीं पुण्यतिथि आई और चली गई। उस शहर में, जिसे उन्होंने दिल खोलकर दिया, कोई बड़ी हलचल नहीं हुई। कुछ अख़बारों में महाराष्ट्र के राज्यपाल द्वारा उनके स्मारक स्थल पर प्रतिमा का अनावरण करते हुए तस्वीरें छपीं। साथ में शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे भी मौजूद थे, लेकिन स्मारक के स्थान पर शायद किसी ने सवाल उठाना ज़रूरी नहीं समझा। कभी शिवाजी पार्क के पास इंदु मिल की ज़मीन पर उनके स्मारक की बात चली थी। फिर अचानक वह चर्चा ख़ामोश हो गई। जैसे शहर ने तय कर लिया हो कि नाना को बस नामों तक सीमित रखना है, उनकी कहानी को नहीं।

### दौलत, भरोसा और गिरगांव का वाड़ा

१८०३ में जन्मे नाना शंकरशेठ मुरकुटे परिवार से थे, जो सोने-चाँदी और आभूषणों के व्यापार में प्रसिद्ध था। उनका कारोबार इतना भरोसेमंद था कि अरब और अफ़ग़ान व्यापारी अपने धन और कीमती सामान बैंकों के बजाय नाना के पास रखवाना ज़्यादा सुरक्षित समझते थे। गिरगांव में उनका विशाल वाड़ा था, जो हाल के वर्षों में एक ऊँची इमारत के लिए ढहा दिया गया। एक और निशानी, जो समय के साथ मिट गई।

### शिक्षा, समाज और भविष्य की नींव

नाना शंकरशेठ ने अपनी ज़मीन और धन को निजी सुख के लिए नहीं, बल्कि सार्वजनिक हित के लिए दिया। उन्होंने ऐसे संस्थानों की स्थापना की, जिनकी सूची मीलों लंबी हो सकती है। बॉम्बे का नेटिव स्कूल, जो आगे चलकर बोर्ड ऑफ़ एजुकेशन बना और फिर एल्फ़िंस्टन कॉलेज के रूप में पहचाना गया। अंग्रेज़ी स्कूल, बालिका विद्यालय, संस्कृत पुस्तकालय, विश्वविद्यालय की स्थापना में सहयोगयह सब उस दौर में हुआ जब शिक्षा को अब भी एक सीमित वर्ग का अधिकार माना जाता था। उन्होंने व्यापारियों और उद्योगपतियों की आवाज़ को संगठित करने के लिए बॉम्बे एसोसिएशन की सह-स्थापना की। संग्रहालयों और बाग़ों के निर्माण में दान दिया। जीजीभॉय के साथ मिलकर इंडियन रेलवे एसोसिएशन बनाई, जो आगे चलकर ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे बनीआज की सेंट्रल रेलवे।

### रेलवे और इतिहास की पहली सवारी

भारतीय रेल के इतिहास में नाना शंकरशेठ का नाम एक मील का पत्थर है। १६ अप्रैल १८५३ को बॉम्बे से ठाणे के बीच चली पहली यात्री ट्रेन में वे स्वयं मौजूद थे। उस समय ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे के दस निदेशकों में सिर्फ़ दो भारतीय थेसर जमशेदजी जीजीभॉय और नाना शंकरशेठ। यही वजह है कि मुंबई सेंट्रल स्टेशन का नाम उनके नाम पर रखने की मांग आज फिर उठ रही है।

### समाज सुधार और राजनीतिक भूमिका

नाना केवल दानवीर नहीं थे। वे समाज सुधारक भी थे। सती प्रथा के उन्मूलन में ब्रिटिश सरकार ने उनके प्रभाव का सहारा लिया। वे बॉम्बे लेजिस्लेटिव काउंसिल के पहलेभारतीय सदस्य बने। एशियाटिक सोसाइटी के सदस्य बने, जब भारतीयों का वहाँ प्रवेश भी आसान नहीं था। डॉ. भाऊ दाजी लाड और सर जॉर्ज बर्डवुड के साथ मिलकर उन्होंने मुंबई को तंग गलियों वाले कस्बे से खुली सड़कों और पेड़ों से सजे शहर में बदलने की योजना पर काम किया।

### क्यों नहीं बने वे 'आइकन'

शायद इसलिए कि नाना शंकरशेठ ने कभी खुद को राजनीतिक प्रतीक नहीं बनाया। उन्होंने सत्ता के बजाय सेवा को चुना। और शायद यही वजह है कि आज उन्हें सिर्फ़ नामों और मूर्तियों में समेट दिया गया है। लेकिन अगर महाराष्ट्र को एक आदर्श नागरिक का उदाहरण देना हो, तो नाना शंकरशेठ से बेहतर नाम शायद ही कोई हो।

मुंबई आज भी उनके योगदान को पूरी तरह स्वीकार नहीं कर पाई है। लेकिन अगर आप ध्यान से देखें, तो शहर के हर कोने में उनकी छाया मौजूद हैस्टेशन में, कॉलेज में, सड़कों में और उस सोच में, जिसने मुंबई को सिर्फ़ एक शहर नहीं, बल्कि एक विचार बनाया।

# हमालाच्या मुलाने उभी केली ४,५०० कोटींची कंपनी

## आता दिग्गजाची १५०० कोटी रुपये भागीदारीची ऑफर, कसा होता प्रवास?

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संघर्ष हीच यशाची गुरुकिल्ला आहे, हे पीसी मुस्तफा यांच्या जीवनप्रवासातून दिसून येते. कर्नाटकातील एका छोट्या गावात एका हमालाच्या पोटी जन्मलेल्या मुस्तफा यांनी गरिबी आणि अनेक समस्यांवर मात करत आज 'आयडी फ्रेश फूड' या ४,५०० कोटी रुपयांच्या कंपनीचे साम्राज्य उभे केले आहे. त्यांचा हा प्रेरणादायी प्रवास आज लाखो तरुणांसाठी एक आदर्श बनला आहे.



### गरिबीतून आयआयटी आणि कॉर्पोरेट करिअर

पीसी मुस्तफा यांचे बालपण अत्यंत कठीण परिस्थितीत गेले. कुटुंबाचे उत्पन्न मर्यादित असूनही त्यांनी शिक्षणाशी कधीही तडजोड केली नाही. गणितातील त्यांची आवड आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी आयआयटी मद्रासमध्ये प्रवेश मिळविला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी काही काळ कॉर्पोरेट क्षेत्रात नोकरी केली. मात्र, स्वतःचे काहीतरी वेगळे करण्याची आणि लोकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची जिद्द त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती.

२००५ मध्ये पीसी मुस्तफा यांनी आपल्या मित्रांच्या मदतीने बेंगळुरूमध्ये एका ५० स्क्वेअर फुटांच्या छोट्या किचनमधून 'आयडी फ्रेश फूड'ची सुरूवात केली. त्यावेळी त्यांच्याकडे फक्त एक मिक्सर, एक ग्राइंडर आणि एक जुनी स्कूटर होती. घरगुती चवीचे, ताजे आणि कोणत्याही केमिकलशिवाय इडली डोसा बॅटर (पीठ) ग्राहकांपर्यंत पोहोचविणे हा त्यांचा साधा विचार होता. गुणवत्तेमुळे या ब्रँडवर लोकांचा विश्वास बसला आणि व्यवसायाचा विस्तार होत गेला. आज ही कंपनी केवळ पिठापुरती मर्यादित नसून पराठा, चपाती, वडा बॅटर आणि दुग्धजन्य पदार्थही तयार करते.

### विदेशी गुंतवणूक आणि ४,५०० कोटींचे मूल्य

कंपनीच्या दमदार कामगिरीमुळे अनेक मोठे गुंतवणूकदार आकर्षित झाले आहेत. प्रेमजी इन्व्हेस्ट आणि टीपीजी न्यूक्वेस्ट यांच्यानंतर आता लंडनच्या अपेक्स पार्टनर्स या फर्मने कंपनीत ३५ टक्क्यांहून अधिक हिस्सा खरेदी केला आहे. हा व्यवहार १,५०० कोटी रुपयांहून अधिक किमतीचा असून, यामुळे कंपनीचे एकूण मूल्यांकन आता ४,५०० कोटी रुपयांवर पोहोचले आहे.

### भविष्यातील विस्तार

अपेक्स पार्टनर्सच्या या गुंतवणुकीनंतर कंपनी आता भारत आणि आखाती देशांमध्ये आपला व्यवसाय अधिक विस्तारण्याच्या तयारीत आहे. नवीन बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्यासोबतच उत्पादनांची श्रेणी वाढविण्यावरही कंपनीचा भर असणार आहे. पीसी मुस्तफा यांची कहाणी दाखविते, की परिस्थिती कशीही असो, मोठी दृष्टी आणि प्रामाणिक परिश्रमाने एका हमालाचा मुलगाही कोट्यवधी रुपयांची कंपनी उभारू शकतो.

# अंड्यांपेक्षाही जास्त व्हिटॅमिन डी कोणत्या पदार्थांमध्ये असते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बहुतांश प्रौढ लोकांसाठी दररोज सुमारे ६०० आययू व्हिटॅमिन डी लागतो. पण ७० वर्षांपेक्षा जास्त झाल्यावर शरीराला थोडे जास्त म्हणजे ८०० आययू दररोज लागतो. (आययू म्हणजे इंटरनॅशनल युनिट, व्हिटॅमिनची मोजण्याची पद्धत). जरी अंड्यांचे पौष्टिक मूल्याबद्दल अनेकदा कौतुक केले जात असले, तरी एका मोठ्या अंड्यामध्ये फक्त ४४ आययू व्हिटॅमिन डी असते; जे आपल्या दैनंदिन गरजेच्या फक्त ७ टक्के असते. ज्यांना व्हिटॅमिन डी चे सेवन वाढवायचे आहे त्यांच्यासाठी, असे अनेक पदार्थ आहेत; ज्यात या महत्त्वाच्या पोषक तत्त्वाचे प्रमाण जास्त असते. इटिंगवेलमध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार काही पदार्थांमध्ये अंड्यांपेक्षा जास्त व्हिटॅमिन डी असते. ट्राउट मासा खा- यामध्ये सुमारे ८५.०५ ग्रॅम, ६४५१७ व्हिटॅमिन डी असते, जे बहुतेक प्रौढांसाठी दैनंदिन गरजेच्या १०० टक्क्यांपेक्षा पेक्षा जास्त आहे आणि व्हिटॅमिन डी च्या सर्वांत श्रीमंत नैसर्गिक स्रोतांपैकी एक आहे. ट्राउट मासा उच्च दर्जाचे प्रथिने आहे; जे हृदयाचे आरोग्य



राखण्यासाठी प्रभावी असल्याचे दिसून आले आहे.

### मशरूमचे सेवन करा

अर्धा कप मशरूममध्ये अंदाजे ५०५१७ व्हिटॅमिन डी असते. मशरूम व्हिटॅमिन डीच्या काही वनस्पती-आधारित स्रोतांपैकी एक आहे. अतिनील प्रकाशात आल्यावर त्यांच्या व्हिटॅमिन डीचे प्रमाण वाढते. जर्नल ऑफ ॲग्रिकल्चरल अँड फूड केमिस्ट्रीमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, मशरूमला १५-२० मिनिटे यूव्ही लाईटमध्ये किंवा तेजस्वी सूर्यप्रकाशात ठेवल्याने त्यांच्या व्हिटॅमिन डीचे प्रमाण ७०० ते ८०० टक्क्यांपर्यंत वाढू शकते. यामुळे सेलेनियम, पोटॅशियम आणि बी जीवनसत्त्वे तुम्हाला मिळतात.

### सॅल्मन (रावस) खा

शिजवलेल्या सॅल्मनमध्ये अंदाजे ४४७१७ व्हिटॅमिन डी असते, जे दैनंदिन गरजेच्या सुमारे ७५ टक्के भाग पूर्ण करते. वाईल्ड सॅल्मनमध्ये जास्त व्हिटॅमिन डी असते. त्यात ओमेगा-३ फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात असतात; जे मेंदू, हृदयाचे आरोग्य सुधारतात.

### फोर्टिफाइड दूध

एक कप फोर्टिफाइड गाईच्या दुधात अंदाजे १२४१७ व्हिटॅमिन डी असते. फोर्टिफाइड दूधव्हिटॅमिन डी, कॅल्शियम, व्हिटॅमिन बी १२ चा एक उत्कृष्ट स्रोत आहे. याचे सेवन केल्याने हाडे मजबूत होतात, उर्जेची पातळी वाढते. नियमितपणे दूध पिल्याने आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण होण्यास मदत होते.

### सार्डिन मासे

सार्डिन मासे खाल्ल्याने व्हिटॅमिन डी मिळतो. २ सार्डिनमध्ये सुमारे ४६१७ व्हिटॅमिन डी असतो. हे एका अंड्यापेक्षा थोडे जास्त असू शकते. सार्डिनमध्ये कॅल्शियम, व्हिटॅमिन बी १२, ओमेगा-३ फॅटी ॲसिड देखील भरपूर असतात; जे हाडे मजबूत करतात, हृदयाचे आरोग्य सुधारतात.

# 'राग सोड ना भाऊ', मैदानावरील वादानंतर सूर्याने कुलदीपची कशी समजूत काढली? व्हिडिओ होतोय व्हायरल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



भारताने टी-२० विश्वचषक गट टप्प्यात पाकिस्तानचा ६१ धावांनी पराभव केला. पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात टीम इंडियाने एकतर्फी विजय नोंदवला. वर्ल्डकपमधील पाकिस्तानविरुद्ध भारताचा हा आठवा विजय होता. पाकिस्तानला पराभूत करत भारताने सुपर-८ व्या फेरीत धडक मारली. भारताच्या पाकिस्तानविरूद्ध विजयानंतर हार्दिक पंड्या व सूर्यकुमार यादव कुलदीप यादववर संतापले होते. पण सूर्या मैदानाबाहेर कुलदीपला कसं मनवत होता, याचा व्हीडिओ त्याने शेअर केला आहे.

पाकिस्तानचा बाद होणारा उस्मान तारिक हा शेवटचा फलंदाज होता. हार्दिक पंड्याने त्याला १८ व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर झेलबाद केले. यासह पाकिस्तान ऑल आऊट झाला. सामन झाल्यानंतर हार्दिक पंड्या, कुलदीप यादववर संतापला होता. व्हिडिओमध्ये हावभाव करून संभाषण होत असल्याचे दिसून आले, तर तिलक वर्मा देखील तेथे होता. रिंकू सिंगने परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला. हार्दिकनंतर संघाशी हँडरोक करताना कर्णधार सूर्यकुमार यादवदेखील कुलदीपवर डोळे वटारत त्याला काहीतरी बोलताना दिसला. ज्याचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल होत आहे. ही घटना पाहिल्यानंतर लगेचच चाहत्यांच्या मनात प्रश्न निर्माण झाला की भारतीय संघात काही गडबड आहे का?

मैदानावरील वादानंतर सूर्याने कुलदीपबरोबर व्हिडिओ शेअर करत चर्चांना दिला पूर्णविराम.

१६ फेब्रुवारीला कर्णधार सूर्यकुमार यादवने इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. ज्यामध्ये सूर्यकुमार यादव व कुलदीप यादव दिसत आहेत. या व्हिडिओला सूर्याने "राग सोड ना भाऊ" असं कॅप्शन दिलं आहे. तर हेरा फेरीमधील डायलॉग या व्हीडिओमध्ये ऐकू येत आहेत. सूर्या व कुलदीप ज्याप्रमाणे हँडरोक करत असताना कर्णधार त्याच्यावर संतापला होता, तीच घटना या व्हीडिओमध्ये रिक्रिएट केली आहे. चाहत्यांनी या व्हीडिओला ड्रेसिंग रूम बॉन्डिंग म्हटलं आणि सूर्याने ही रील शेअर करून सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे. मैदानावर घडणाऱ्या गोष्टी या मैदानावरच सोडून देत संघ पुढे आल्याचं या व्हीडिओमधून सांगण्यात येत आहे. पाकिस्तानला पराभूत केल्यानंतर टीम इंडिया कोलंबोहून भारतात परतली आहे आणि आता त्यांचा पुढचा सामना नेदरलँड्सविरुद्ध असेल.

पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात १८ व्या षटकात कुलदीप यादवने हार्दिक पंड्याच्या गोलंदाजीवर सीमारेषेवर उस्मान तारिकचा झेल सोडला होता, ज्यामुळे हे सर्व प्रकरण घडले होते. त्याचे खराब क्षेत्ररक्षण पाहून हार्दिक पंड्या आणि सूर्यकुमार यादव खूप संतापलेले होते. सामना संपल्यानंतर जेव्हा सूर्या संघातील खेळाडूंशी हँडरोक करत होता तेव्हा तो कुलदीपला फटकारताना दिसला. हा व्हिडिओ सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल झाला. त्यामुळे सामन्याच्या दुसऱ्याच दिवशी सूर्याने सोशल मीडियावर एक रील शेअर केला.


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे
तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५
वर्षांचा समृद्ध
अनुभव
असलेले
शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# दर्श अमावास्येला मिळते पितृदोषापासून मुक्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात दर्श अमावास्येला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी दर्श अमावास्येनिमित्त अनेकांकडून विविध धार्मिक पूजा-अर्चा करण्यात आली. स्नान-दान, पितरांची पूजा, पितृतर्पण यासाठी हा दिवस शुभ मानला जातो. असे केल्याने व्यक्तीला पुण्यफळ मिळते, असे मानले जाते. या दिवशी चंद्र देवाचीही पूजा केली जाते. मान्यतेनुसार या महिन्यातील दर्श अमावास्येच्या दिवशी चंद्राची पूजा केल्यास साधकाला इच्छित फळ मिळते, अशी मान्यता आहे. या दिवशी स्नान आणि आराधना केल्याने पितृदोषापासून मुक्ती मिळते. चला जाणून घेऊया दर्श अमावास्येचा स्नान-दानाचा मुहूर्त आणि महत्त्व.

### दान साहित्य

दर्श अमावास्येच्या दिवशी तीळ, कोरडे लाकूड, ब्लँकेट, उबदार कपडे, मिठाई, शूज, काळे कपडे, सोने, डाळ, तूप, पीठ, फळे, आवळा, साखर आदींचे दान करू शकता.

### दर्श अमावास्या का साजरी करतात?

ज्योतिषशास्त्रात चंद्राला मनाचा कारक मानले आहे. असे मानले जाते की दर्श अमावास्येच्या दिवशी चंद्राची पूजा करणे आणि सायंकाळी चंद्रोदयाला अर्घ्य देणे जातकाला तणावापासून मुक्त करते आणि मानसिक शांती देते. दर्श अमावास्येच्या दिवशी उपवास केल्याने चंद्रदेव प्रसन्न होतात आणि जीवनातील संकटे दूर होतात. असे म्हटले जाते, की या व्रताने जीवन सुखी होते. कुंडलीतील चंद्राची स्थिती कमकुवत असली तरी दर्श अमावास्येच्या दिवशी चंद्रदेवाची पूजा करून उपवास ठेवता येतो. यामुळे जीवनात सुख-समृद्धीचा मोकळा होईल, असे मानले जाते. या दिवशी पूजा आणि धार्मिक कार्याचे शुभ फळ प्राप्त होते.

### काय करावे?

१) अमावास्येच्या दिवशी पितरांचे तर्पण, श्राद्ध आणि पिंडदान केल्याने पितृदोष दूर होतो.
२) अमावास्येच्या दिवशी उपवास करणे लाभदायक मानले जाते. असे मानले जाते, की या दिवशी उपवास केल्याने वैवाहिक जीवन सुखी होते.
३) अमावास्येच्या दिवशी भगवान शंकर यांची पूजा करणे शुभ मानले जाते. शिवलिंगावर बेलपत्र, मध, दही, चंदन आणि फळे इत्यादी अर्पण करावे.
४) अमावास्येच्या दिवशी सूर्य देवाला जल अर्पण करणे शुभ मानले जाते.
५) अमावास्येच्या दिवशी गरीब व गरजू लोकांना दान करावे. धान्य, उबदार कपडे इत्यादींचे दान करणे शुभ मानले जाते.

### काय करू नये?

१) अमावास्येच्या दिवशी घरात वादविवाद करू नये.
२) अमावास्येच्या दिवशी कोणाचाही अपमान करू नये.
३) अमावास्येच्या दिवशी सूड बुद्धीपासून अंतर ठेवावे.
४) अमावास्येच्या दिवशी काळ्या वस्तूंचे दान करावे.

# रामकृष्ण परमहंस : सर्वधर्मसमभावाचा तेजस्वी दीप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**जयंती विशेष**

भारतीय अध्यात्म परंपरेत अनेक संत, महात्मे आणि तत्त्वज्ञानी होऊन गेले. परंतु सर्वधर्मसमभाव, प्रत्यक्ष अनुभूती आणि साधेपणातून अध्यात्माचा संदेश देणारे श्री रामकृष्ण परमहंस यांचे स्थान विलक्षण आहे. बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी त्यांची जयंती आहे. त्यानिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आणि विचारांचा वेध घेणे म्हणजे भारतीय आध्यात्मिक वारशाचा पुन:स्मरण करण्यासारखे आहे.

### बालपण आणि आध्यात्मिक ओढ

रामकृष्ण परमहंस यांचा जन्म १८ फेब्रुवारी १८३६ रोजी बंगालमधील कामारपुकुर या गावी झाला. त्यांचे मूळ नाव गदाधर चट्टोपाध्याय. लहानपणापासूनच त्यांना ईश्वरभक्ती, भजन-कीर्तन आणि आध्यात्मिक चिंतन यांची आवड होती. शालेय शिक्षणात त्यांची विशेष गती नसली तरी धार्मिक कथा, पुराणे आणि देवभक्ती यात ते तल्लीन होत. लहान वयातच त्यांना ध्यानावस्थेचे आणि समाधीचे अनुभव येऊ लागले, जे त्यांच्या विलक्षण आध्यात्मिक प्रवासाची सुरूवात ठरले.

### दक्षिणेश्वरातील साधना

नंतर ते कोलकात्याजवळील दक्षिणेश्वर काली मंदिर येथे पुजारी म्हणून कार्य करू लागले. येथे त्यांनी माता कालीची अखंड भक्ती केली. त्यांच्या साधनेची तीव्रता इतकी होती, की ते देवदर्शनासाठी आर्त होऊन रडत, तळमळत. अखेरीस त्यांना माता कालीचे साक्षात् दर्शन झाल्याचा अनुभव आला, असे त्यांच्या शिष्यांनी नोंदविले आहे. या अनुभवानंतर त्यांच्या जीवनाला नवी दिशा मिळाली. रामकृष्णांनी केवळ हिंदू धर्माचीच नव्हे, तर इस्लाम आणि ख्रिस्ती धर्माचीही साधना करून पाहिली. काही काळ त्यांनी मुस्लिम फकीराप्रमाणे जीवन जगले, तर काही काळ येशूच्या प्रेमभावनेत तल्लीन झाले. त्यांच्या अनुभवानुसार सर्व धर्म एकाच सत्याकडे नेतात. 'जितके मत, तितके मार्ग' हा त्यांचा संदेश आजही अत्यंत समकालीन वाटतो.

### विवेकानंदांसारखा शिष्य



रामकृष्ण परमहंस यांच्या जीवनातील महत्त्वाचा अध्याय म्हणजे त्यांची आणि स्वामी विवेकानंद (नरेंद्रनाथ दत्त) यांची भेट. विवेकानंद सुरुवातीला तर्कवादी होते. 'देव आहे का?' या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर त्यांना हवे होते. रामकृष्णांनी त्यांना प्रत्यक्ष अनुभूतीचा मार्ग दाखवला. त्यांच्या सान्निध्यात विवेकानंदांचा आध्यात्मिक परिवर्तनाचा प्रवास सुरू झाला. नंतर विवेकानंदांनी १८९३ साली वर्ल्डस् पार्लमेंट ऑफ रिलिजन्स येथे हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व करत जगाला भारतीय अध्यात्माची ओळख करून दिली. या कार्यामागे रामकृष्णांच्या शिकवणीचा दृढ पाया होता. पुढे विवेकानंदांनी रामकृष्ण मिशनची स्थापना करून गुरूंचा संदेश समाजसेवेच्या माध्यमातून पुढे नेला.

### शिकवण आणि तत्त्वज्ञान

रामकृष्ण परमहंस यांची शिकवण अत्यंत सोपी आणि अनुभवाधिष्ठित होती. ते म्हणत, की 'ईश्वरप्राप्तीसाठी प्रामाणिक तळमळ आवश्यक आहे.' त्यांनी कधीही गुंतागुंतीचे तत्त्वज्ञान मांडले नाही; उलट साध्या उदाहरणांतून, दृष्टांतांतून ते अध्यात्म समजावून सांगत. त्यांच्या मते- प्रत्येक धर्म हा एका पर्वताच्या शिखराकडे जाणारा वेगळा मार्ग आहे. मार्ग वेगळे असले तरी गंतव्य एकच आहे. त्यामुळे त्यांनी कधीही धर्मांधतेला प्रोत्साहन दिले नाही. प्रेम, करुणा, नि:स्वार्थ सेवा आणि सत्यनिष्ठा हीच खरी साधना असल्याचा त्यांनी आग्रह धरला.

### आजच्या काळातील संदर्भ

आजच्या काळात जगात वाढत चाललेली धार्मिक असहिष्णुता, मतभेद आणि संघर्ष पाहता रामकृष्ण परमहंस यांचा सर्वधर्मसमभावाचा संदेश अधिक महत्त्वाचा वाटतो. विविधतेत एकता हा भारताचा आत्मा आहे; आणि हा आत्मा जीवंत ठेवण्याचे कार्य रामकृष्णांनी केले. त्यांनी दिलेला अध्यात्माचा मार्ग हा केवळ मठ-मंदिरापुरता मर्यादित नव्हता. सामान्य माणसाने आपल्या दैनंदिन जीवनात प्रामाणिकपणा, प्रेम आणि सेवाभाव ठेवला, तरी तो ईश्वराच्या अधिक जवळ जातो, असे ते सांगत. त्यामुळे त्यांचे विचार समाजजीवनालाही दिशा देणारे आहेत.

रामकृष्ण परमहंस हे केवळ एक संत नव्हते, तर मानवतेच्या एकात्मतेचा संदेश देणारे विश्वगुरू होते. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या शिकवणीचे स्मरण करून आपल्या जीवनात सहिष्णुता, प्रेम आणि सेवा यांचा स्वीकार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या जीवनातून आपण शिकतो, की ईश्वर कोणत्याही एका धर्मात किंवा पंथात मर्यादित नाही. तो प्रत्येकाच्या अंत:करणात आहेफक्त त्याला अनुभवण्याची तळमळ हवी. रामकृष्ण परमहंस यांचा हा सार्वकालिक संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे.

**दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे त्यांना विनम्रतापूर्ण आदरांजली.**


# श्रीकृष्ण स्पर्श

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'कुब्जा' हे नाव ऐकल्यावर डोळ्यासमोर येते ती मथुरेतील कंसाची दासी. कुरुप, कुबड असलेली एक वृद्धा. कंसासाठी ती चंदन घेऊन जात असते. वाटेत श्रीकृष्ण भेटतात. म्हणतो, 'सुंदरी, मला देशील चंदन?' कुणी तरी तिला प्रथमच 'सुंदरी' म्हणाले होते. तिने श्रीकृष्ण यांना चंदनाचा लेप लावला. श्रीकृष्ण कुणाकडून तसेच काही कसे घेतील? त्यांनी कुब्जेच्या हनुवटीला धरून ती वर उचलली आणि कुब्जा खरोखर सुंदर झाली.

भक्तांना हे सहजच पटते. चिकित्सकांना ही निव्वळ कल्पीत कहाणी वाटते. मला या कथेतून वेगळाच आनंद मिळतो. कुणी असुंदर असेल तर मान उंचावून कसे वावरेल? त्यात दासी असल्याने तिला 'तोंड वर करायचा' अधिकार तरी कसा असेल? श्रीकृष्णांनी कुब्जेची हनुवटी उंचावली. तिला ताठ व्हायला शिकवले. कुरूप असो की दासी असो; मान वर करूनच जगले पाहिजे, हे भान श्रीकृष्णांनी तिला दिले.

'दिसण्या-असण्यातून' न्यूनगंड



निर्माण होऊ न देता आपणही दिमाखात जगू शकतो, हे दाखविण्याची संधी ईश्वराने किती विश्वासाने आपल्याला दिली आहे. कुब्जा सुंदर झाली की नाही हे मला ठाऊक नाही; पण मनातील असुंदरतेची जाणीव श्रीकृष्णांनी दूर केली, असे मला वाटते. इकडे विठुरायानेही कंबरेवर हात ठेवून थाटात उभे राहत हे दाखवून दिले, की सौंदर्य नाही तर औदार्य महत्त्वाचे. सौंदर्य येते आणि वयोमानाने ओसरतेही. औदार्य अठ्ठावीस युगे टवटवीतच राहते.

खूपदा भक्ती करणारेही जेव्हा म्हणतात, की देवा-धर्माचे इतके आम्ही करतो; पण ईश्वराची कृपा काही होत नाही. पण पारमार्थिक साधना म्हणजे जग बदलणे नाही, तर आपला दृष्टिकोन बदलणे हे समजले, की आपल्या वृत्तीच्या कुब्जेला सुंदर व्हायला वेळच लागत नाही.

रखरखत्या उन्हात कुठून कोकीळ कुजन ऐकू आले की मनाला निवलेपण जाणवते ना? पहिल्या पावसाने आसमंतभर दरवळणाऱ्या मातीच्या गंधाने चित्ताला हरखून जायला होते की नाही? तान्हे मूल कुणाचेही असो; गर्दी-गोंधळातही आपल्याकडे बघून गोड हसते तेव्हा आपल्याही ओठांवर स्मितरेषा दरवळते की नाही? आपल्याबाबत हे घडते तेव्हा निश्चित मानावे की आपल्याला श्रीकृष्णांचा स्पर्श झाला आहे. अंतरीची ही निरपेक्ष संवेदनशीलता हाच श्रीकृष्णांचा साक्षात्कार.

मनातील असुंदरतेची, अपूर्णतेची जाणीव संपली की सारे सुंदरच आहे, हे जाणवते. माझ्या कृष्णाने निर्माण केलेले काहीही असुंदर असूच शकत नाही, ही श्रद्धा दृढ असली की झाले.
सुंदर ते ध्यान उभे विटेवरी
कर कटिवरी ठेवूनीया

**। जय श्री कृष्ण ।**

# बुधवारी काय करावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बुधवार हा गणपती बाप्पा आणि बुध ग्रहाचा दिवस मानला जातो. त्यामुळे या दिवशी गणपती बाप्पांची विशेष पूजा, दुर्वा अर्पण करणे, हिरव्या मूग डाळीचे दान करणे आणि 'गणेश स्तोत्र' किंवा 'दुर्गा सप्तशती'चे पठण करणे अत्यंत शुभ असते. या सेवांमुळे आर्थिक अडचणी दूर होऊन करिअर आणि व्यवसायात वृद्धी होते.

### बुधवारी करावयाच्या विशेष सेवा आणि उपाय

**गणपती पूजा :** बुधवारी सकाळी स्नानानंतर गणपतीला दुर्वा, शेंदूर आणि मोदक अर्पण करून पूजा करावी.
**'ॐ गं गणपतये नमः'** या मंत्राचा जप करावा.
**मूग डाळीचे दान :** बुधवारी मूग डाळ (हिरवी) दान करणे अत्यंत शुभ मानले जाते. यामुळे कुंडलीतील बुध ग्रह मजबूत होतो.
**दुर्गा सप्तशती पाठ :** बुधवारी दुर्गा सप्तशतीचे पठण केल्याने जीवनातील सर्व संकटे दूर होतात.
**हिरव्या रंगाचा वापर :** बुधवारी हिरवे कपडे किंवा हिरवा रुमाल जवळ ठेवल्यास कामात यश मिळते.
**गणेश अभिषेक :** गणपती बाप्पांना दही-साखरेचा किंवा दुधाचा अभिषेक करावा.

### काय करावे? (उपाय)

- गरीब किंवा गरजूला हिरवे मूग दान करावेत.
- गायीला हिरवे गवत किंवा हिरवा चारा भरवावा.
- गणपती मंदिरात जाऊन बाप्पांना दुर्वा अर्पण कराव्यात.
- लेखन, शिक्षण किंवा नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी हा दिवस उत्तम आहे.

### काय टाळावे?

- बुधवारी काळे कपडे घालणे टाळावे.
- कोणाशीही वाद घालू नये किंवा कोणाचा अपमान करू नये.
- कर्ज घेणे किंवा देणे टाळावे.

# चौसष्ठ योगिनी : शक्तिसाधनेचा महासागर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय संस्कृती आणि अध्यात्माचा विचार करताना आपण अनेकदा मुख्य देवतांच्या आणि भक्तिमार्गाच्या चर्चांमध्ये रममाण होतो, परंतु या प्रवाहाच्या अगदी समांतर आणि काहीसा गुप्त असा एक शक्तीचा प्रवाह हजारो वर्षांपासून भारतात वाहत आहे, ज्याला आपण 'तंत्रसाधना' किंवा 'शक्ती उपासना' म्हणून ओळखतो. या शक्ती उपासनेच्या केंद्रस्थानी अत्यंत रहस्यमय, प्रभावशाली आणि काहीशा भीतीदायक वाटणाऱ्या ज्या शक्ती आहेत, त्यांना 'चौसष्ठ योगिनी' असे संबोधले जाते. भारताच्या विविध भागांत, विशेषत: मध्य प्रदेश आणि ओडिशामध्ये आजही यांची वर्तुळाकार, छताविना असलेली गूढ मंदिरे उभी आहेत, जी आपल्या प्राचीन प्रगत स्थापत्यशास्त्राची आणि तंत्रविद्येची साक्ष देतात. या चौसष्ठ योगिनी नेमक्या कोण आहेत, त्यांचे कार्य काय आणि त्यांची उपासना का केली जाते, हा विषय आजही अभ्यासकांसाठी आणि साधकांसाठी कुतूहलाचा विषय आहे.

योगिनी म्हणजे काय, हे समजून घेण्यासाठी आपल्याला शब्दाच्या मुळाशी जावे लागेल. 'योग' या शब्दाचा अर्थ जोडणे असा होतो. जी शक्ती साधकाला परब्रह्माशी किंवा शिवतत्वाशी जोडते, ती योगिनी होय. तांत्रिक ग्रंथानुसार, आदिमायेने किंवा आदिशक्तीने विश्वाच्या कल्याणासाठी आणि असुरांच्या निर्दालनासाठी स्वत:चे विभाजन करून ज्या विविध रूपांना जन्म दिला, त्या मुख्य शक्तींचा समूह म्हणजे चौसष्ठ योगिनी. पुराणांमध्ये, विशेषत: 'अग्निपुराण', 'कालिकापुराण' आणि 'स्कंदपुराणा'मध्ये यांच्या उत्पत्तीच्या विविध कथा आढळतात. यातील सर्वात प्रचलित कथा रक्तबीज राक्षसाशी संबंधित आहे. जेव्हा देवी दुर्गा आणि रक्तबीज यांच्यात घनघोर युद्ध सुरू होते, तेव्हा रक्तबीजाला मिळालेल्या वरदानामुळे त्याच्या रक्ताचा प्रत्येक थेंब जमिनीवर पडताच त्यातून नवीन राक्षस निर्माण होत असे. या संकटाचा सामना करण्यासाठी देवीने आपल्या शरीरातून अनेक उग्र शक्ती निर्माण केल्या, ज्यांनी रक्तबीजाचे रक्त जमिनीवर पडण्याआधीच प्राशन केले. या शक्तींनाच योगिनी म्हटले गेले. काही ग्रंथांनुसार या योगिनी म्हणजे माता पार्वतीच्या सख्या किंवा सेविका आहेत, ज्या अष्टमातृकांचे (ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी,



वाराही, इंद्राणी, चामुंडा आणि नारसिंही) प्रतिनिधित्व करतात. प्रत्येक मातृकेच्या अधिपत्याखाली आठ उप-योगिनी अशा प्रकारे एकूण चौसष्ठ योगिनींचा समूह तयार होतो.

या योगिनींची रूपे आणि कार्ये अत्यंत वैविध्यपूर्ण आहेत. काही योगिनी सौम्य आणि सुंदर मानवी रूपात आहेत, तर काही अत्यंत उग्र आणि प्राणी-पक्ष्यांचे मुख असलेल्या आहेत. उदाहरणार्थ, काही योगिनींचे मुख मांजराचे, काहीचे घोड्याचे, तर काहींचे घुबडाचे आहे. हे रूप केवळ भीतीदायक नसून ते निसर्गातील विविध शक्तींचे आणि मानवी मनातील विविध वृत्तींचे प्रतीक आहे. तंत्रशास्त्रानुसार या चौसष्ठ योगिनी मानवाच्या शरीरातील, मनातील आणि विश्वातील चौसष्ठ प्रकारच्या कला आणि गुणांवर नियंत्रण ठेवतात. संगीत, नृत्य, युद्धकला, औषधीशास्त्र, आणि गुप्त विद्या अशा चौसष्ठ कलांवर त्यांचे प्रभुत्व असते. त्यामुळेच प्राचीन काळी केवळ मोक्ष प्राप्तीसाठीच नव्हे, तर ऐहिक जगात विजय, समृद्धी आणि विशेष सिद्धी प्राप्त करण्यासाठी राजे आणि साधक या योगिनींची उपासना करत असत. या योगिनी दिशा, काळ आणि पंचमहाभूतांवर नियंत्रण ठेवू शकतात, असा विश्वास तांत्रिक परंपरेत आहे.

या शक्तींच्या उपासनेसाठी उभारलेली मंदिरे ही भारतीय मंदिर वास्तुकलेतील एक वेगळा आणि अद्वितीय अध्याय आहे. सामान्यत: हिंदू मंदिरे ही शिखर असलेली आणि बंदिस्त गाभाऱ्याची असतात, परंतु चौसष्ठ योगिनींची मंदिरे ही पूर्णपणे उघड्या आकाशाखाली, वर्तुळाकार भिंतींच्या स्वरूपात बांधलेली असतात. मध्य प्रदेशातील मितावली (मोरेना), जबलपूर येथील भेडाघाट आणि ओडिशामधील हिरापूर व राणीपूर-झारियाल ही या मंदिरांची प्रमुख उदाहरणे आहेत. ही मंदिरे छताविना असण्यामागे एक खोल तांत्रिक अर्थ दडलेला आहे. योगिनींना 'खेचरी' असेही म्हटले जाते, ज्याचा अर्थ आकाशात संचार करणाऱ्या शक्ती. त्यांच्या मुक्त संचाराला अडथळा येऊ नये आणि वैश्विक ऊर्जेचा थेट प्रवाह मूर्तींमध्ये आणि साधकामध्ये सामावला जावा, यासाठी ही मंदिरे आकाशाकडे उघडी ठेवली जात असावीत. विशेष म्हणजे, भारताच्या जुन्या संसद भवनाची गोलाकार रचना ही मोरेना येथील चौसष्ठ योगिनी मंदिरावरून प्रेरित असावी, असा एक लोकप्रिय कयास आहे, जो या मंदिरांच्या स्थापत्यशास्त्राचे महत्त्व अधोरेखित करतो. या मंदिरांच्या मध्यभागी मुख्य मंडप असतो, जिथे अनेकदा भैरवाची मूर्ती असते. तांत्रिक परंपरेत शक्ती ही शिवाशिवाय अपूर्ण मानली जाते, त्यामुळे योगिनींच्या नृत्यात किंवा सभेत भैरव हा साक्षीभावाने किंवा नियंत्रक म्हणून उपस्थित असतो.

योगिनींची उपासना पद्धती ही अत्यंत क्लिष्ट आणि गुप्त मानली जाते, जी सामान्य गृहस्थांच्या पूजाविधीपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. ही प्रामुख्याने 'कौल मार्ग' किंवा 'वाम मार्गा'शी संबंधित साधना आहे. यात यंत्र, मंत्र आणि न्यास यांना अनन्यसाधारण महत्त्व असते. साधक विशिष्ट तिथींना, विशेषत: अमावास्या किंवा अष्टमीच्या रात्री, स्मशानात किंवा निर्जन स्थळी असलेल्या योगिनी मंदिरात जाऊन साधना करतात. प्रत्येक योगिनीचा स्वतंत्र बीजमंत्र आणि यंत्र असते. या साधनेचा मुख्य उद्देश 'अष्टसिद्धी' (अनिमा, महिमा, गरिमा इत्यादी) प्राप्त करणे हा असतो. असे मानले जाते की, जो साधक योगिनींना प्रसन्न करून घेतो, त्याला भूत, भविष्य आणि वर्तमानाचे ज्ञान प्राप्त होते, तसेच रोगांचे निवारण करणे, शत्रूवर विजय मिळवणे आणि निसर्गावर ताबा मिळवणे या गोष्टी साध्य होतात. मात्र, ही साधना दुधारी तलवारीसारखी असते. यात जराही चूक झाल्यास साधकाला त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात, अशी भीती असल्याने या विद्या गुप्त ठेवल्या गेल्या आणि केवळ गुरु-शिष्य परंपरेतूनच पुढे दिल्या गेल्या. हिरापूरसारख्या ठिकाणी आजही स्थानिक लोक या देवींना 'ग्रामदेवता' म्हणून पूजतात, पण मूळ तांत्रिक विधी आता काळाच्या ओघात बरेचसे लुप्त झाले आहेत.

आजच्या काळात चौसष्ठ योगिनींचे महत्त्व केवळ अंधश्रद्धा किंवा जादूटोणा यापुरते मर्यादित नाही, तर ते स्त्रीशक्तीच्या अमर्याद रूपांचे दर्शन आहे. या योगिनी हे दर्शवतात की स्त्री केवळ ममतामयी आई नाही, तर ती सृष्टीची संरक्षक आणि संहारक देखील आहे. तिचे रूप कधी सौम्य असू शकते, तर कधी अत्यंत उग्र. मानवी मनातील भीती, काम, क्रोध आणि मोह यांवर विजय मिळवून त्या ऊर्जेचे रूपांतर उच्च आध्यात्मिक शक्तीमध्ये करणे, हा योगिनी उपासनेचा खरा गाभा आहे. चौसष्ठ हा आकडा देखील भारतीय कालगणनेत आणि गणितात महत्त्वाचा आहे, जो काळाच्या चक्राचे प्रतीक आहे. त्यामुळे योगिनी साधना ही शेवटी काळावर विजय मिळवण्याची साधना ठरते. आज जेव्हा आपण या भग्न झालेल्या मंदिरांकडे पाहतो, तेव्हा त्यातील दगडी मूर्तींच्या डोळ्यांतील तीक्ष्णता आजही आपल्याला त्या गतवैभवाची आणि त्यामागील प्रचंड तपश्चर्येची जाणीव करून देते. विज्ञानाच्या युगात आपण या गोष्टींकडे केवळ पुराणकथा म्हणून पाहू शकतो, परंतु मानवी मनाच्या अथांग शक्तीचा शोध घेण्याच्या प्रक्रियेत या योगिनींचे स्थान आजही मानसशास्त्रीय आणि आध्यात्मिक दृष्ट्या तितकेच महत्त्वाचे आहे. भारताच्या या प्राचीन वारशाचे जतन करणे आणि त्यामागील मूळ तत्त्वज्ञान समजून घेणे हे आपल्या संस्कृतीच्या समृद्धतेसाठी आवश्यक आहे.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**